# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** कराड शहर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0478 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/07/2019 21:05 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 22/07/2019

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/07/2019

**Time From (वेळेपासून):** 11:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:28 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/07/2019 **Time (वेळ):** 20:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 061 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/07/2019 21:05 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** उपविभागीय अधिकरी कराड , यांचे निवासस्थानासमोरील ,मोकळ्या जागेत

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सचिन मोहन पवार

**(b) Father's Name (वडील का नाव) :** मोहन पवार

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1986 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रेठरे बु, ताकराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रेठरे बु, ताकराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9420999345

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोविंद सुभाष बेलवणकर | | वडील का नाम : सुभाष | 1. व्यंकटेश सोसायटी, कार्वे रोड, ,कराड, कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | ताजुद्दीन इब्राहीम शिकलगार | | | 1. रेठरे बु ता कराड,कराड शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिति देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

खबरी जबाब दिनांक 22/07/2019मी, सचिन मोहन पवार, वय 33 वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. मु. पो. रेठरे बु॥, ता.कराड जि.सातारा मोबाईल नंबर 9420999345 समक्ष कराड शहर पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझी आई, वडील, पत्नीसह एकत्रात राहणेस असुन मी कृष्णा फाऊंडेशन एज्युकेशन संस्थेमध्ये नोकरीस आहे. आमचे मौजे रेठरे बु॥ ता.कराड येथील ग्रामपंचायत मिळकत नं. 274 व 276 मध्ये वडिलोपार्जीत घर असुन ते घर माझे वडील श्री. मोहन शंकर पवार व चुलते श्री. भिमराव शंकर पवार यांचे नावे सामाईक आहे.माझे चुलते श्री. भिमराव शंकर पवार यांनी नमुद मिळकतीमधील घराचा त्यांचा हिस्सा हक्क सोडपत्रा व्दारे माझे वडील श्री. मोहन शंकर पवार यांचे नावे केला. त्या संदर्भात दिनांक 05/02/2019 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय कराड येथे हक्क सोडपत्र दस्त केला असुन त्या दस्ताचा क्रमांक 245/2019 असा आहे.सदर दस्ताची नोंद आमचे मिळकत पत्रकावर होण्यासाठी माझे वडील श्री. मोहन शंकर पवार यांनी कराड भुमी अभिलेख कार्यालयात जावुन अर्ज करुन त्या अर्जा सोबत दस्ताची झेरक्स जोडुन दिनांक 28/03/2019 रोजी जमा केली व त्याची पोहोच घेवुन आले. त्यानंतर मी आमचे दस्ताची नोंदीचे संदर्भात कराड भुमी अभिलेख कार्यालयात दोन तीन वेळा गेलो.त्यावेळी दस्ताची नोंद करण्याचे काम करणारे कर्मचारी मोजणीसाठी बाहेर गेले असल्याने दस्ताची नोंद झाली किंवा नाही याबाबत माहिती मिळाली नाही.त्यानंतर मी काल दिनांक 19/07/2019 रोजी भुमी अभिलेख कार्यालय कराड येथे गेलो व माझ्या कामाची चौकशी केली असता ते बेलवणकर रावसाहेब यांचेकडे असल्याचे समजले. त्यानंतर मी, त्या कार्यालयातील बेलवणकर साहेब यांचेकडे जावुन माझ्या वडीलांनी दिलेल्या अर्जाची पोहोच दाखविली व दस्त नोंदीचे कामाबाबत सांगितले. त्यावेळी बेलवणकर साहेबांनी मला थोडावेळ बाजुला थांबण्यास सांगुन काही वेळाने माझ्या वडीलांनी दिलेल्या अर्जाचे प्रकरणाबाबत माझ्याकडे विचारपुस केली. त्यावेळी बेलवणकर साहेबांनी कार्यालयातील भाई नावाचे इसमास, भाई यांचे कामाच काय ते सांगा त्यांना असे सांगितले. त्यावेळी मी व भाई नावाचे इसम थोडे बाजुला गेलो. त्यावेळी भाई नावाचे इसमाने मला, तुम्ही पहिल्या साहेबांना पैसे दिले नसल्यामुळ तुमच काम झाल नाही, तरी साहेबांना दिड ते दोन हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणाले. त्यानंतर मी परत बेलवणकर साहेबांकडे जावुन, सध्या माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणालो. त्यावेळी बेलवणकर साहेबांनी, भाईंनी सांगितल ना तुम्हाला तस करा, उद्या या पैशाचे तयारीने असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना, बर ठिक आहे, उद्या तुमची भेट घेतो असे म्हणालो व तेथुन निघुन गेलो. भूमी अभिलेख कार्यालय, कराड येथील बेलवणकर साहेब हे 2000/- रूपये घेतल्याशिवाय माझे वडीलांनी दिलेल्या हक्कसोड पत्र दस्ताची नोंद करुन तसा उतारा देणार नाही अशी माझी खात्री झाली, म्हणुन मी,

लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात दिनांक 19/07/2019 रोजी फोन करुन पोलीस उपअधीक्षक श्री. शिर्के, यांना माझी वरील प्रमाणे तक्रार असल्याचे कळविले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मला दिनांक 20/07/2019 रोजी 11.00 वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाचे समोरील रस्त्यावर येवुन थांबण्याची सुचना दिली.त्यानंतर दिनांक 20/07/2019 रोजी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालय कराड येथील समोरील रस्त्यावर येवुन माझ्याशी संपर्क साधुन मला त्या ठिकाणी बोलावुन घेतले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, त्यांचे सापळा पथकासह खाजगी वाहनामध्ये हजर होते. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व उपविभागीय अभियंता, तारळी सिंचन उपविभाग, नागठाणे कार्यालयातील 1) रामचंद्र दादु मोरे व 2) प्रकाश आनंदराव शिंदे, दोन्ही कालवा निरीक्षक या दोन पंचांसह व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी, माझा लेखी तक्रारी अर्ज व त्यासंबधीचे कागदपत्रे शिर्के साहेबांकडे हजर केले. त्याचे त्यांनी व दोन्ही पचांनी वाचन करुन त्यावर सहया केल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन रामचंद्र मोरे व पंच नं. 2 म्हणुन प्रकाश शिंदे यांनी काम करण्याचे शिर्के साहेबांनी ठरवुन मला व पंच नं. 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने पंच नं. 1 यांचेसोबत बेलवणकर साहेबांची भेट घेण्यासाठी रवाना करुन पडताळणी केली असता त्यामध्ये बेलवणकर साहेब व माझी समक्ष भेट झाली. त्यावेळी बेलवणकर साहेबांनी, माझे वडील व चुलते यांनी मौजे रेठरे बु ता.कराड येथील मिळकत क्रमांक 274 व 276 मधील असलेल्या घराबाबत केलेल्या हक्कसोड पत्र दस्ताची नोंद करुन तसा उतारा देण्यासाठी तडजोडीअंती 1500/- रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच उप-अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय कराड येथे स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची, रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 1500/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन बेलवणकर साहेबांची भेट घेण्याकामी उपअधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय कराड येथे रवाना केले. आयोजित केले सापळा कारवाईमध्ये माझी व बेलवणकर साहेबांची समक्ष भेट झाली. त्यावेळी बेलवणकर साहेबांनी 1500/- रुपये लाच रक्कम न स्विकारता उद्या ये उद्या बघु आपण, उद्या असे म्हणुन लाच रक्कम दिनांक 20/07/2019 रोजी न स्विकारता दिनांक 21/07/2019 रोजी स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची शिर्के साहेब व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांनी दिनांक 21/07/2019 रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले त्याबाबतचा दिनांक 20/07/2019 रोजी पडताळणी, सापळा पुर्व व सापळा मागे घेतला पंचामाना करण्यात आला आहे.त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी दिले आदेशाप्रमाणे मी दिनांक 21/07/2019 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालय कराड येथील समोरील रस्त्यावर येवुन थांबलो. काहीवेळातच श्री. शिर्के साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक त्या ठिकाणी हजर झाले.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 1500/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन बेलवणकर साहेबांची भेट घेण्याकामी उपअधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय कराड येथे रवाना केले. आयोजित केले सापळा कारवाईमध्ये माझी व बेलवणकर साहेबांची समक्ष भेट झाली. त्यावेळी बेलवणकर साहेब यांनी मला, अजिम भाई, उद्या सकाळी येईल ऑफीसला, भाई कडे दे काय अडचण नाय असे म्हणुन माझ्याकडील 1500/- लाच न स्विकारता ती लाच रक्कम भाई नावाचे इसमाकडे दिनांक 22/07/2019 रोजी देण्यास सांगितल्याची शिर्के साहेब व दोन्ही पंचांची खात्री झाली. त्यानंतर शिर्के साहेब यांनी दिनांक 22/07/2019 रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले. त्याबाबतचा दिनांक 21/07/2019 रोजी सापळा पुर्व व सापळा मागे घेतला पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर श्री.शिर्के साहेब यांनी दिले आदेशाप्रमाणे मी दिनांक 22/07/2019 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालय कराड येथील समोरील रस्त्यावर येवुन थांबलो. काही वेळातच श्री. शिर्के साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक त्या ठिकाणी हजर झाले.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 1500/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन बेलवणकर साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे भाई या नावाचे इसमाची भेट घेण्याकामी उपअधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय कराड येथे रवाना केले. मी व पंच नं. 1 मोरे असे दोघेजण भुमि अभिलेख कार्यालय कराड येथे गेलो. तेथे मी, कार्यालयाचे समोर असलेल्या रस्त्याचे बाजुस वाहन पार्क केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 पायी चालत भुमि अभिलेख कार्यालय कराडचे इमारतीमध्ये गेलो. त्याठिकाणी एक गांधी टोपी घातलेल्या इसम भाई असल्याचे मी पंच नं. 1 यांना इशारा करुन सांगितले. त्यावेळी भाई यांनी मला हातवारे करुन, आलो बाहेर, काय, असे म्हणुन मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यांनतर मी व पंच नं. 1 असे आम्ही दोघे चालत चालत भुमि अभिलेख कार्यालयाचे बाहेर रस्त्यावर येवुन भाई यांची वाट पाहत थांबुन राहिलो. काही वेळातच भाई, माझ्या जवळ आले त्यावेळी मी त्यांना, बेलवणकर साहेबांनी तुमच्याकडे दीड हजार रुपये द्यायला सांगितले असे म्हणालो, त्यावर भाई यांनी, हा, किती दिल्यात असे विचारले. त्यावेळी मी, दिड हजार असे म्हणालो. त्यावेळी भाई हे, जरा थांब की, जरा थांब, असे म्हणाले. त्यावेळी मी, पंच नं. 1 व भाई असे चालत चालत चर्चा करत भुमि अभिलेख कार्यालयाचे समोरील रोडने काही अंतरावर पुढे गेलो. त्यावेळी भाई यांनी, पैसे संध्याकाळन दया, संध्याकाळीच दया, घरात दया की असे म्हणाले. त्यावेळी मी, हित घ्या की इथ कोण नाय आता असे म्हणालो. त्यांनतर भाई यांनी मला, किती हायत, असे विचारुन लाच मागणी केली. त्यावेळी मी माझ्या शर्टचे छातीवरील डाव्या बाजुचे खिशातुन 1500/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन भाई यांचे समोर धरुन, दिड हजार असे म्हणाले. त्यावेळी भाई यांनी ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजत, काय विश्वास नाय व्हय, असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना, ती काम होईल ना आता असे विचारताच, भाई यांनी, होईल की, डेफिनटली कराय लावतो असे म्हणाले. त्यानंतर मी, भाई यांचे पासुन थोडे बाजुला जावुन माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशार केला तो इशारा पाहुन श्री. शिर्के व पथक माझ्या जवळ आले. श्री. शिर्के साहेबांनी माझ्याकडील व्हईस रेकर्डर काढुन बंद केला व मला थोडे बाजुला थांबण्यास सांगितले. त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी भाई यांना पकडले असस्थेत घेवुन भुमि अभिलेख कार्यालयात गेले त्यावेळी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले.तरी गोविंद सुभाष बेलवणकर, वय 47 वर्षे, निमताणदार क्रमांक 2, उपअधीक्षक भुमि अभिलेख कार्यालय कराड वर्ग - 3, सध्या रा. व्यंकटेश सोसायटी, कार्वे रोड, कराड मुळ रा. 17/अ, कर्वे रोड पुणे 4 यांनी दिनांक 20/07/2019 रोजी पडताळणी व सापळा कारवाईवेळी माझ्याकडे, माझे वडील व चुलते यांनी मौजे रेठरे बु ता.कराड येथील मिळकत क्रमांक 274 व 276 मधील असलेल्या घराबाबत केलेल्या हक्कसोड पत्र दस्ताची नोंद करुन तसा उतारा देण्यासाठी तडजोडीअंती 1500/- रुपयांची लाच मागणी करुन तील लाच रक्कम दिनांक 21/07/2019 रोजीचे सापळा कारवाईवेळी भाई या खाजगी इसमाकडे देण्यास सांगितली. त्यानंतर दिनांक 22/07/2019 रोजीचे सापळा कारवाईमध्ये निमताणदार बेलवलकर यांनी 1500/- रुपये लाच रक्कम (खाजगी इसम भाई) ताजुद्दीन इब्राहीम शिकलगार, वय 71 वर्षे, रा. रेठरे बु ता. कराड जि. सातारा यांचे करवी उपविभागीय

अधिकरी कराड यांचे निवासस्थानासमोरील मोकळ्या जागेत 11.28 वाजण्याचे सुमारास स्विकारली आहे. म्हणून माझी त्या दोघांचे विरुध्द तक्रार आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SARJERAO BABURAO GAIKWAD(I (Inspector)) / PDBN57165 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Sachinmuai

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): SARJERAO BABURAO GAIKWA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PDBN57165

पोलीस स्टेशन ऑफीसर
कराड शहर पो. ठाणे, जि. सातारा
दि. २२ / ५ /२० १९